जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१८/6680
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 10 /०८/ २०१८

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य (सर्व),
शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ऑगस्ट/सप्टेंबर २०१८**
**परीक्षा केंद्रावरील Keyboard आणि Mouse बाबत...**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, ऑगस्ट/सप्टेंबर २०१८ मध्ये होणाऱ्या GCC-TBC ३० व ४० श.प्र.मि. परीक्षेसाठी ज्या संस्थांनी परीक्षार्थी प्रविष्ठ केले आहेत, त्या संस्थांना परीक्षा केंद्रावर स्वत:चे **Keyboard आणि Mouse** वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, याबाबत संस्थांनी पुढील बाबींची दक्षता व नोंद घ्यावी.

१. इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. ची परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक दिवस अगोदर ( दि. १६ ऑगस्ट २०१८ रोजी ११.०० पर्यंत) **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.
२. मराठी व हिंदी ३० व ४० श.प्र.मि.ची परीक्षा सुरु होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर ( दि. २८ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी ११.०० पर्यंत) **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.
३. परीक्षा केंद्रावर जमा केलेले **Keyboard आणि Mouse** त्या परीक्षा केंद्रावरील सर्व परीक्षार्थ्यांना वापरण्यास उपलब्ध असतील.
४. संबंधित केंद्रावरील संपूर्ण परीक्षा पूर्ण झाल्यानंतरच हे **Keyboard आणि Mouse** संस्थांना परत मिळू शकतील. म्हणजे संबंधित संस्थेस परीक्षा पूर्ण होण्यापूर्वी **Keyboard आणि Mouse** परत मिळू शकणार नाहीत.
५. संस्थांनी **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रांना उपलब्ध करुन देणे हे ऐच्छिक असेल. तसेच या साहित्याची हानी, तूट-फूट झाल्यास अथवा हरवल्यास त्याची कोणतीही भरपाई परीक्षा केंद्राकडून अथवा परीक्षा परिषदेकडून मिळणार नाही. याचीही संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.
६. परीक्षा केंद्रावर स्वत:चे **Keyboard आणि Mouse** टंकलेखन संस्थांनी उपलब्ध करुन देण्यास परवानगी देण्यात आली असल्याने परीक्षा केंद्रावरील **Keyboard आणि Mouse** बाबतच्या कोणत्याही तक्रारींची यापुढे दखल घेतली जाणार नाही.

**(सु.बा.माळी)**
**उपायुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

**प्रत कार्यवाहीसाठी :-**

१. शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. सर्व.
२. शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प).
३. सर्व केंद्रसंचालक व सर्व केंद्रसमन्वयक ( I T टीचर) परीक्षा केंद्र (GCC-TBC) ऑगस्ट / सप्टें २०१८.